अर्ज नमुना नं. ०१

www.sskindia.in

कल्याणकारी लोकशाहीचा.... लोकाभिमुख चेहरा....!

# फेरीवाले व रस्त्याच्या बाजुला किरकोळ विक्री व्यवसाय करणाऱ्या पदपथ विक्रेते यांना कायदेशिर तरतुदीनुसार परवाना व ओळखपत्र मिळवुन देण्यासाठी सुविधा सेवा केंद्रामार्फत औपचारिक व तांत्रिक सहाय्य मागणीसाठीचा अर्ज

**सविस्तर माहितीचा व्हिडीओ इंटरनेटवरील खालील लिंक्स वर पहावा.**

**मराठी व्हिडिओ :-** http://www.youtube.com/watch?v=NpVx3xEqNQE

**हिंदी व्हिडिओ :-** http://www.youtube.com/watch?v=hjCfQMtovss


## सुविधा सेवा केंद्र,

युनिट नं. ४०७/४०८, मास्टरमाईंड बिल्डींग नं. १, आय.टी. पार्क, रॉयल पाम्स, आरे कॉलनी,
मयुर नगर, गोरेगांव (पुर्व), मुंबई - ४०० ०६५.
दूरध्वनी : ०२२-२८७२२१४४/४५/४६/४७/०९२७२५३०२८८/०९२७०३६०३४८
०९२०९६३७०३१/०९२०९६३७६३०/०९२०९६३७७२७
संकेतस्थळ : www.sskindia.in
E-mail : - ssk111mumbai@gmail.com

**संक्षिप्त रूपरेषा**

आपल्या आवडीचा रोजगार निवडण्याचा अधिकार प्रत्येक भारतीयाला संविधानाने दिला आहे. परंतु अनेक युवकांना रोजगार उपलब्ध होत नाही. उदरनिर्वाहासाठी त्यांना विविध मार्गांचा अवलंब करावा लागतो. इमानदारीने काम करण्याचा एक मार्ग म्हणून रस्त्यावर उपयोगी सामानांची विक्री करण्याचा पर्याय काही जण निवडतात. अनेकदा त्यांच्यावर कायदेशीर कारवाई केली जाते. परंतु, अलीकडेच सुप्रीम कोर्टाने दिलेल्या निकालात सध्याची शहरी लोकसंख्या आणि रोजगाराची अपुरी साधने यावर प्रकाशझोत टाकण्यात आला आहे. जीवन जगण्यासाठी फेरीवाल्यांना रस्त्यावर मालाची विक्री करण्याचा मार्ग अवलंबवावा लागतो. परंतु, त्यांना पोलीस आणि पालिका प्रशासनाचा मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागतो. म्हणून या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्याच्या सूचना न्यायालयाने सरकारला केल्या होत्या. त्यानुसार सरकारने **'फेरीवाला (उपजीविका संरक्षण आणि विनियमन) विधेयक – २०१२' अंमलात आणले आहे. फेरीवाल्यांना जीवन जगण्यासाठी रोजगार उपलब्ध करून देणारे, रोजगाराला संरक्षण देणारे आणि त्यांच्या रोजगाराचे विनियमन करणारे हे विधेयक नुकतेच संसदेने मंजूर केले आहे.** फेरीवाल्यांचे अनेक दिवसांचे स्वप्न या नविन कायद्याने साकार होणार आहे.

रस्त्यावर व्यवसाय करणाऱ्या फेरीवाऱ्यांना कायदेशीर संरक्षण, उपजीविकेची हमी आणि सामाजिक सुरक्षेचा मूलभूत अधिकार देणे हा 'फेरीवाला (उपजीविका संरक्षण आणि विनियमन) विधेयक–२०१२' चा मुख्य उद्देश आहे. प्रामुख्याने शहरी भागात रस्त्यावर व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यांना तसेच हॉकर्सना या विधेयकामुळे रोजगाराचा कायदेशीर अधिकार मिळणार असून पोलीस आणि पालिका प्रशासनाच्या जाचातून त्यांची मुक्तता होणार आहे.

किरकोळ विक्रेते हा शहरी अर्थव्यवस्थेचा महत्वाचा भाग आहे. फेरीवाले आणि रस्त्यावरील किरकोळ वस्तुविक्रेते या दोन्हींचा उल्लेख 'स्ट्रीट व्हेंडर' म्हणून एकत्रितरीत्या करण्यात आला आहे. फेरीवाला व्यवसाय हा शहरातील गरिबांचा एक व्यवसाय असून या व्यवसायातून शहरातील सामान्य नागरिकांना सहज आणि स्वस्त वस्तू उपलब्ध होतात. कमी शिक्षण आणि अकुशलता यामुळे उत्तम प्रकारचा रोजगार अनेक लोकांना मिळत नाही. अशा लोकांसाठी फेरीवाला व्यवसाय सहज आणि उपयुक्त ठरला आहे. स्वयंरोजगाराच्या या व्यवसायातून घाम गाळून अनेक जण आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत असतात. अशा परिस्थितीत या फेरीवाल्यांना संरक्षण आणि विनियमन) विधेयक – २०१२' या कायद्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी सुरू होईपर्यंत 'राष्ट्रीय फेरीवाला धोरण – २००९ ची अंमलबजावणी लागु आहे.

'फेरीवाला (उपजीविका संरक्षण आणि विनियमन) विधेयक – २०१२' ची अंमलबजावणी करताना प्रत्येक महानगरपालिका क्षेत्रात 'शहर फेरीवाला समिती' स्थापन करावी लागणार आहे. या फेरीवाला समितीमध्ये महापालिका आयुक्त, वाहतून विभागाचे वरिष्ठ अधिकारी, लोकप्रतिनिधी, फेरीवाल्यांचे प्रतिनिधी, रहिवासी कल्याण संस्थेचे सदस्य, व्यापारी संस्थेचे प्रतिनिधी आणि महिला प्रतिनिधी यांचा समावेश असणार आहे. 'शहर फेरीवाला समिती' सर्वप्रथम पूर्वीच्या परवानाधारक फेरीवाल्यांना प्रमाणपत्र देणार आहे. त्यानंतर 'हॉकर्स झोन' साठी उपलब्ध होणाऱ्या जागेनुसार राज्यात १५ वर्षापासून अधिक काळ वास्तव्य करणाऱ्या फेरीवाल्यांना जागा उपलब्ध करून दिली जाणार आहे. हॉकर्स झोनमध्ये जागा उपलब्ध करून देताना, ३ टक्के अपंग, २५ टक्के मागासवर्गीय, १० टक्के दारिद्र्यरेषेखालील घटक असे आरक्षण असणार असून प्रत्येक प्रवर्गातील आरक्षणात महिलांना ३० टक्के आरक्षण मिळणार आहे. महिलांना आरक्षण देताना, विधवा आणि निराधार महिलांना प्राधान्य दिले जाणार आहे.

'शहर फेरीवाला समिती' दर पाच वर्षांनी फेरीवाला क्षेत्राबद्दल अटी आणि नियम यांचा फेरआढावा घेणार आहे. या समितीकडे **प्रत्येक फेरीवाल्याची नोंदणी असणे अनिवार्य असून, नोंदणीनंतर त्याला सदस्यत्वाचे प्रमाणपत्र दिले जाणार आहे.** रेल्वे, रेल्वेची जमीन या नियमांमधून वगळण्यात आली आहे. 'फेरीवाला (उपजीविका संरक्षण आणि विनियमन) विधेयक – २०१२' च्या अंतर्गत योजना बनवून फेरीवाला विधेयक लागू करण्याची जबाबदारी राज्य सरकारवर सोपविण्यात आली आहे. **जोपर्यंत राज्य सरकार योजना बनवून लागू करीत नाही, तोपर्यंत कोणत्याही फेरीवाल्यावर निष्कासनाची आणि स्थलांतराची कारवाई करता येणार नाही अशी तरतून 'फेरीवाला (उपजीविका संरक्षण आणि विनियमन) विधेयक – २०१२' मध्ये करण्यात आली आहे.** एकदा फेरीवाल्यास त्याच्या विक्री करावयाच्या वस्तु, जागा आणि वेळ यासंबंधी आणि तस्त्सम अटींबाबत प्रमाणपत्र दिले, की त्या प्रमाणपत्रातील अटींना अधिन राहून त्या फेरीवाल्यावर कोणतीही कारवाई करता येणार नाही. अशा प्रकारे केंद्र सरकारने प्रमाणपत्रधारक फेरीवाल्याला संरक्षित केले असून, त्याला पोलीस आणि महानगरपालिका प्रशासनाकडून कोणताही त्रास होणार नाही अशी तरतूद केली आहे.

५० वर्षापेक्षा अधिक काळापासून अस्तित्वात असणाऱ्या बाजारपेठांना नैसर्गिक बाजारपेठा असे संबोधले जाणार असून, अशा बाजारपेठांमधील फेरीवाल्यांना कायदेशीर संरक्षण मिळणार आहे. केंद्र आणि राज्याच्या परस्पर सहकार्यातून 'फेरीवाला (उपजीविका संरक्षण आणि विनियमन) विधेयक - २०१२' या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी केली जाणार आहे. फेरीवाल्यांना स्थलांतरित करावयाचे झाल्यास, शहर फेरीवाला समितीची शिफारस असणे बंधनकारक करण्यात आले आहे. फेरीवाला संबंधित तक्रारींची तड लावण्यासाठी निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र यंत्रणा स्थापन केली जाणार आहे. **प्रमाणपत्रधारक फेरीवाल्याचे निधन झाल्यास, किंवा प्रकृती अस्वास्थ्यामुळे तो काम करू शकत नसल्यास त्याच्या कुटूंबातील सदस्याला फेरीवाला व्यवसाय करण्याचा अधिकार देण्यात आला आहे.**

शहरी फेरीवाला समितीच्या माध्यमातून स्थानिक क्षेत्रात दक्षता समित्यांची स्थापना करण्याची तरतूद विधेयकात असून, अशा दक्षता समित्यांच्या माध्यमातून फेरीवाल्यांचे नियमन केले जाणार आहे. फेरीवाल्यांमुळे वाहतूक कोंडी, अस्वच्छता आणि ध्वनिप्रदूषण होऊ नये, तसेच चोरीच्या घटनांना आळा बसावा यासाठी पालिका प्रशासनाला प्रयत्न करावे लागणार आहेत. 'फेरीवाला (उपजीविका संरक्षण आणि विनियमन) विधेयक - २०१२' **या विधेयकाच्या अंमलबजावणीमुळे फेरीवाले तणावरहित आणि मुक्त वातावरणात आपला व्यवसाय करू शकणार आहेत. फेरीवाल्यांसाठी जागा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी पालिका प्रशासनावर असणार आहे.**

लोकसभेत ज्या वेळी 'फेरीवाला (उपजीविका संरक्षण आणि विनियमन) विधेयक - २०१२' हे चर्चेला आले, त्या वेळी सर्वच पक्षाच्या नेत्यांनी या विधेयकाला पाठिंबा दर्शवला. रस्त्यावर व्यवसाय करणाऱ्याकडे सहानुभूतीने पाहण्याची आणि त्याला सामाजिक सुरक्षा देण्याची गरज सर्वांनी बोलुन दाखवली. आपल्या देशातील सुमारे २ टक्के लोकसंख्या फेरीवाला व्यवसायात असुन, गेल्या काही वर्षात हे प्रमाण २.५ टक्क्यांपेक्षा अधिक होण्याची शक्यता आहे. फेरीवाल्यांची ही वाढती लोकसंख्या पाहता, त्यांना कोणत्याही अडथळ्यांशिवाय सन्मानाने फेरीवाला व्यवसाय करण्याचा अधिकार या कायद्याने मिळवून दिला आहे.

**पुणे महानगरपालिकेसारख्या महानगरपालिकांनी 'जी पी एस' तंत्रज्ञानाच्या माध्यमातुन सर्वेक्षण करण्यासाठी ठोस पावले अचलली आहेत.** त्याचप्रमाणे सर्वच ठिकाणच्या नगरपालिका नगरपरिषदा, नगरपंचायती व महानगरपालिका पदपथ विक्रेता व फेरीवाल्यांचे सर्वेक्षण सुरू करित आहेत. येत्या काही दिवसात ही प्रक्रिया मोठ्या वेगाने गती घेणार आहे.

राज्य सरकारने महापालिकांना आपल्या क्षेत्रात हॉकर्स झोन जाहीर करून नव्या फेरीवाला धोरणाच्या अंमलबजावणीसाठी तयार राहण्याचे निर्देश दिले आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार धोरणाच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासन कार्यरत आहे. नविन धोरणानुसार फेरीवाल्यांची / पदपथविक्रेत्यांची नोंदणी करणे. त्यांना अधिकृत परवाना देणे त्याचबरोबर फेरीवाला क्षेत्र ठरविणे या कामास मोठ्या प्रमाणात गती मिळाली आहे. त्यानुसार महापालिकेच्या नियमांची पुर्तता करणाऱ्या एकाही फेरीवाल्यावर कारवाई होणार नाही. त्यासाठी सर्व फेरीवाल्यांना या बाबतीतील सर्व तांत्रिक औपचारिकता पुर्ण करणे कामी सुलभिकरण व्हावे व सोईस्कर व्हावे यासाठी **फेरीवाले व रस्त्याच्या बाजुला किरकोळ विक्री व्यवसाय करणाऱ्या पदपथ विक्रेते यांना परवाना व ओळखपत्र मिळवुन देण्यासाठीचा नावनोंदणी उपक्रम सुविधा सेवा केंद्राने सुरू केला आहे.**

थोडक्यात, फेरीवाले (हॉकर्स), रस्त्याच्या बाजुला विक्रीचा व्यवसाय करणारे किरकोळ विक्रेते (पदपथ विक्रेते/स्ट्रीट व्हेंडर्स) यांना कायदेशिर संरक्षण व उपजीविकेची हमी आणि सामाजिक सुरक्षेचा व व्यवसाय करण्यासाठीचा मुलभुत अधिकार देणारे 'पदपथ विक्रेता (उपजीविका संरक्षण आणि पदपथ विक्री विनियमन) विधेयक' व 'राष्ट्रीय फेरीवाला धोरण २००९' च्यानुसार फेरीवाले व पदपथविक्रेते यांना कोणत्याही अडथळ्याविना सन्मानाने व्यवसाय करण्याचा अधिकार आहे. त्यायोगे पालिका प्रशासन व पोलीस कार्यवाहीच्या वारंवार होणाऱ्या त्रासापासुन संरक्षण मिळाले आहे. **सुविधा सेवा केंद्राच्या या उपक्रमामधुन रस्त्यावर व्यवसाय करणारे फेरीवाले (हॉकर्स), रस्त्याच्या बाजुला व्यवसाय करणारे किरकोळ विक्रेते (पदपथ विक्रेते/स्ट्रीट व्हेंडर्स) यांपैकी कोणत्याही १४ वर्षापेक्षा मोठ्या व्यक्तीची सदर कायद्यानुसार फेरीवाला/पदपथ विक्रेता म्हणुन नोंदणी करवुन देणे; तसेच त्यांना सदरचा व्यवसाय करण्याचा परवाना व ओळखपत्र मिळवुन देणे. याविषयीच्या सुविधांसह सर्व औपचारिक प्रक्रियांसाठींचे तांत्रिक सहाय्य पुरविणे. सदर व्यक्तींना पदपथ विक्रेता व फेरीवाले यांच्यासाठी सक्षम नेतृत्व असलेल्या स्थानिक/राज्यस्तरीय/देशपातळीवरील संघटनांचे सभासदत्व मिळवुन देणे तसेच वेळोवेळी होणारे कायदे, नियम, तत्सम जाहिराती, बातम्या व या क्षेत्रातील अद्ययावत माहिती पोहचविणे आदि सेवा एकत्रित पणे पुरविण्यासाठी सुविधा सेवा केंद्र मुंबईमार्फत नावनोंदणी सुरू करण्यात आली आहे.**

# विविध वृत्तपत्रातील बातम्या

# फेरीवाल्यांना संरक्षण

## राज्य सरकारचा आदेश; चार महिन्यांत नोंदणी बंधनकारक



**राज्यात फेरीवाले किती?**

| | |
|---|---|
| » एकूण संख्या | १५ लाख |
| » मुंबई | ३ लाख; परवानाधारक १८ हजार |
| » ठाणे | १ लाख ५ हजार |
| » पुणे | १ लाख २५ हजार |
| » नागपूर | ६० हजार |
| » नाशिक | ८० हजार |
| » औरंगाबाद | ६५ हजार |

प्रशांत बारसिंग :
सकाळ न्यूज नेटवर्क

मुंबई, ता. २२ : राज्यातील सर्व फेरीवाल्यांची नोंदणी चार महिन्यांत पूर्ण करावी आणि उद्यापासून (ता. २३) कोणालाही हटवू नये, अशा सूचना राज्य सरकारने आज दिल्या. त्यामुळे सुमारे १५ लाख फेरीवाल्यांना संरक्षण मिळणार आहे.

महापालिका आणि नगरपालिका क्षेत्रांत फेरीवाला धोरणाची तातडीने अंमलबजावणी करण्याचे आदेश राज्य सरकारने काल (ता. २१) दिले होते. नव्या धोरणानुसार फेरीवाल्यांची नोंदणी करणे, परवाना देणे, फेरीवाला क्षेत्र ठरविण्यासाठी नगरपालिका मुख्याधिकारी आणि महापालिका आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात येईल. या समितीत नगरसेवक व फेरीवाल्यांच्या प्रतिनिधींचा समावेश असेल.

दोन महिन्यांत स्थापन केल्या जाणाऱ्या समित्यांमध्ये ३० टक्के महिला आणि ४० टक्के. फेरीवाले सदस्य असतील. रेल्वे, मुंबई पोर्ट ट्रस्ट, विमानतळ आदींच्या प्रतिनिधींचा विशेष निमंत्रित म्हणून समितीत समावेश करणे बंधनकारक आहे. फेरीवाल्यांच्या प्रतिनिधींशिवाय समितीची बैठक घेता येणार नाही. चार महिन्यांत सर्व फेरीवाल्यांची नोंदणी पूर्ण करण्याबरोबर फेरीवाला क्षेत्र निर्माण करावे, तोपर्यंत फेरीवाल्यांना हटविण्यात येऊ नये, असे आदेश राज्य सरकारने आयुक्त आणि मुख्याधिकाऱ्यांना दिले आहेत.

# फेरीवाला धोरणाची अंमलबजावणी करा

## राज्य सरकारचे मुंबई, पुण्यासह सर्व महापालिकांना निर्देश

प्रशांत बारसिंग :
सकाळ न्यूज नेटवर्क



| शहरे | फेरीवाले |
|---|---|
| » मुंबई | ३ लाख (परवानाधारक १८ हजार) |
| » ठाणे | १.०५ लाख |
| » पुणे | १.२५ लाख |
| » नागपूर | ६० हजार |
| » नाशिक | ८० हजार |
| » औरंगाबाद | ६५ हजार |

मुंबई, ता. ७ : राज्य सरकारने मुंबई, ठाणे, पुण्यासह सर्व महापालिकांना आपल्या क्षेत्रात हॉकर्स झोन जाहीर करून नव्या फेरीवाला धोरणाच्या अंमलबजावणीसाठी तयार राहण्याचे निर्देश दिले आहेत.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार धोरणाच्या अंमलबजावणीसाठी एक महिन्याच्या आत कृती आराखडा तयार करण्यासाठी राज्य सरकारने तयारी सुरू केली आहे. मुंबईसह अन्य शहरातील फेरीवाल्यांना कायदेशीर मान्यता देण्याच्या मागणीसाठी कामगार नेते शरद राव यांनी न्यायालयात धाव घेतल्यानंतर सरकारला फेरीवाला धोरण आखावे लागले. सन २०१० मध्ये राज्याने तयार केलेल्या धोरणात फेरीवाल्यांना परवाना देणे, फेरीवाला क्षेत्र घोषित करणे, तसेच बेकायदा ठरणाऱ्या फेरीवाल्यांवर कायदेशीर कारवाई करण्याचे मुद्दे समाविष्ट केले होते. बेकायदा फेरीवाल्यांना पाचशे ते पाच हजार रुपयांपर्यंत दंड आकारल्यानंतरही पुन्हा तोच गुन्हा केल्यास सहा महिने कैदेच्या शिक्षेची तरतूदही केली होती; मात्र केंद्र सरकारने राज्याचे हे धोरण फेटाळले होते. त्याऐवजी केंद्र सरकारचे धोरण स्वीकारण्याचे निर्देश राज्याला दिले आहेत.

नव्या धोरणानुसार फेरीवाल्यांची नोंदणी करणे, त्यांना अधिकृत परवाना देण्याबरोबरच फेरीवाला क्षेत्र ठरविण्यासाठी महापालिका आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात येईल. या समितीत शहरातील नगरसेवक व विभागनिहाय फेरीवाल्यांच्या प्रतिनिधींचा समावेश असेल. फेरीवाला प्रतिनिधींशिवाय एकही बैठक घेता येणार नाही, असे नव्या धोरणात म्हटले आहे. समितीतील फेरीवाला प्रतिनिधींचे महत्त्व लक्षात घेता ऐन निवडणुकांच्या तोंडावर शहरांमध्ये परप्रांतीय सत्ताकेंद्रे निर्माण होण्यास कायद्याचा आधार मिळणार असल्याची चर्चा आहे.

# फेरीवाल्यांचा आंदोलनाचा इशारा

सकाळ वृत्तसेवा

मुंबई, ता. ७ : सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाची तत्काळ अंमलबजावणी करा; अन्यथा तीव्र आंदोलन करू, असा इशारा महाराष्ट्र हॉकर्स युनियनने दिला आहे. घाटकोपरमधील सर्वोदय रुग्णालयाच्या सभागृहात आज घेतलेल्या मेळाव्यात त्यांनी हा इशारा दिला. या वेळी सर्व पक्षांचे नेते उपस्थित होते.

फेरीवाल्यांना कायदेशीर संरक्षण देणारे विधेयक केंद्रात मंजूर झाल्याने फेरीवाल्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेले निर्देश राज्य सरकार आणि पालिकेला बंधनकारक आहेत. त्यामुळे पालिकेकडून फेरीवाल्यांवर होणाऱ्या कारवाईला आळा बसेल, असा विश्वास युनियनचे अ‍ॅड. प्रद्युम्न वाघमारे यांनी व्यक्त केला आहे.

या विधेयकाची अंमलबजावणी झाल्यास फेरीवाल्यांना सर्व प्रकारचे संरक्षण मिळणार असून, उपजीविकेची हमी आणि सामाजिक सुरक्षेचा मूलभूत अधिकारही मिळणार आहे. मात्र, त्यासाठी सर्वांनी संघटितपणे लढण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. उपनगरातील फेरीवाल्यांच्या हक्कासाठी आम्ही २३ वर्षांपासून लढत असून, त्यांना न्याय मिळवून देणारच, असा विश्वास युनियनचे सरचिटणीस शरद इंदुलकर यांनी व्यक्त केला. शिवसेनेचे उपनेते दशरथ शिर्के, माजी नगरसेविका व राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या मनोरमा पाटील, प्रभाग समितीचे अध्यक्ष संजय भालेराव, काँग्रेस ब्रिगेडचे अध्यक्ष स्वरूप खेडकर, शाखाप्रमुख जगदीश चौधरी यांनीही फेरीवाल्यांच्या आंदोलनाला पाठिंबा दिला.

# फेरीवाल्यांचे १ डिसेंबरपासून सर्वेक्षण

पुणे, ८ नोव्हें.-सुप्रीम कोर्ट आणि राज्य सरकारच्या निर्देशांनुसार शहरातील सर्व फेरीवाल्यांच्या सर्वेक्षणास एक डिसेंबरपासून सुरुवात केली जाणार आहे. तत्पूर्वी, फेरीवाला समिती स्थापन व्हावी, याकरिता स्वयंसेवी संस्थांना अर्ज करण्यासाठी पंधरा दिवसांची मुदत देण्यात आली आहे.

कोर्ट आणि राज्य सरकारच्या आदेशांनुसार फेरीवाल्यांचे सर्वेक्षण करण्यासाठी पालिकेतर्फे प्रथमच 'जीपीएस' तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे. एक डिसेंबरपासून या सर्वेक्षणाची मोहीम हाती घेतली जाणार असल्याचे सूतोवाच प्रभारी अतिक्रमण प्रमुख माधव जगताप यांनी केले. फेरीवाल्यांच्या सर्वेक्षणासह महापालिकेतील मुख्य फेरीवाला समितीसह क्षेत्रीय कार्यालयनिहाय समित्या स्थापन करण्यासाठीदेखील पालिकेने स्वयंसेवी संस्था आणि रेसिडेन्ट वेलफेअर असोसिएशन यांच्याकडून अर्ज मागविले आहेत. २० नोव्हेंबरपर्यंत हे अर्ज स्वीकारले जाणार असून, त्यानंतर समितीमधील सदस्यांची निवड केली जाणार आहे. या सदस्यांसह फेरीवाला समित्याही स्थापन केल्या जाणार आहेत. रस्ते आणि फूटपाथवर अतिक्रमण करणाऱ्या पथारी व्यावसायिक आणि विक्रेत्यांवर पालिकेने कारवाई सुरू केली होती. मात्र, शहरातील सर्व फेरीवाल्यांचे सर्वेक्षण करून 'फेरीवाला क्षेत्र' आणि 'ना फेरीवाला क्षेत्र' जाहीर केल्यानंतरच कारवाई केली जावी, अशा सूचना सुप्रीम कोर्टाने केल्या होत्या. राज्य सरकारने गेल्या महिन्यात त्याबाबतचा आदेश पालिकांना पाठविला होता. त्यानुसार, पालिकेने या समित्यांच्या स्थापनेसह फेरीवाल्यांच्या सर्वेक्षणासाठी पुढाकार घेतला आहे.

# फेरीवाल्यांना मिळाले अभय!

## कोर्टाचा आदेश: 'फेरीवाला' होण्याची सर्वांना मुभा

अजित गोगटे • मुंबई

फेरीवाल्यांना संरक्षण देणारा व त्यांच्या धंद्याचे नियमन करण्यासाठी केंद्र सरकारने प्रस्तावित केलेला कायदा संसदेच्या मंजुरीनंतर प्रत्यक्षात लागू होईपर्यंत सरकारने २००९ मध्ये जाहीर केलेल्या राष्ट्रीय फेरीवाला धोरणाची अंमलबजावणी करण्याचा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिल्याने देशभरातील सर्व शहरांमधील फेरीवाल्यांना अभय मिळाले आहे. एवढेच नव्हे, तर उपजीविकेचे अन्य कोणतेही साधन नाही असे स्वघोषित प्रतिज्ञापत्र लिहून देणाऱ्या कोणाही नागरिकाला देशाच्या कोणत्याही भागातून कोणत्याही शहरात येऊन फेरीचा धंदा करण्याची मुभा यामुळे मिळणार आहे.

'स्ट्रीट व्हेण्डर्स (प्रोटेक्शन ऑफ लाइव्हलीहूड अ‍ॅण्ड रेग्युलेशन ऑफ स्ट्रीट व्हेंडिंग) बिल, २०१२ हे प्रस्तावित कायद्याचे विधेयक लोकसभेने गेल्या आठवड्यात मंजूर केले. अधिवेशनाचा कार्यकाळ संपल्याने ते राज्यसभेत मंजुरीसाठी येऊ शकले नाही. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र एकता हॉकर्स युनियन वि. बृहन्मुंबई महापालिका या अपिलात न्या. जी. एस. सिंघवी व न्या. व्ही. गोपाळ गौडा यांच्या खंडपीठाने २००९चे धोरण राबविण्याचा आदेश दिला. या धोरणाची अंमलबजावणी करण्यासंबंधीचे निर्देश राज्याच्या मुख्य सचिवांनी एक महिन्यात जारी करायचे आहेत. त्यानंतर फेरीवाल्यांचे नियमन करण्यास त्यानंतरच्या दोन महिन्यांत प्रत्येक शहरात 'शहर फेरीवाला समिती' (टाऊन व्हेंडिंग कमिटी) स्थापन करावी लागेल. मुंबई-पुण्यासारख्या मोठ्या शहरांसाठी एकाहून अधिक समित्या स्थापन करता येतील. त्यावर इतरांखेरीज फेरीवाला संघटनांचे प्रतिनिधी असतील व त्यातील ३० टक्के प्रतिनिधी महिला असतील. ज्या त्या महापालिका / नगरपालिकांचे आयुक्त किंवा मुख्य कार्यकारी अधिकारी या शहर फेरीवाला समितीचे अध्यक्ष असतील.



### नोंदणी आणि ओळखपत्रही

शहर फेरीवाला समितीने शहरातील सर्व विद्यमान फेरीवाल्यांची नोंदणी करून त्यांना फोटो ओळखपत्र द्यायचे आहे.

यासाठी संख्येचे कोणतेही बंधन नसेल. फेरीचा धंदा करण्याची इच्छा असणाऱ्या सर्वांना नोंदणी करून ओळखपत्र मिळेल.

किती जणांना, शहराच्या कोणत्या भागात व दिवसाच्या कोणत्या वेळात फेरीचा धंदा करू द्यायचा, हे समिती ठरवेल.

» आणखी वृत्त/४

नियम तोडणाऱ्यांना दणका : अतिरिक्त आयुक्त देणार साहाय्यक आयुक्तांना आदेश

# उगाचच फेरीवाल्यांवर कारवाई नाही

चेतन ननावरे • मुंबई



आझाद मैदानावर काढण्यात आलेल्या मोर्चात सहभागी झालेले फेरीवाले.

आता महापालिकेच्या नियमांची पूर्तता करणाऱ्या एकाही फेरीवाल्यावर कारवाई करण्यात येणार नसल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त मोहन आडताणी यांनी 'लोकमत'ला दिली. उद्या (शुक्रवारी) पालिकेच्या २४ वॉर्डांमधील सर्व साहाय्यक पालिका आयुक्तांना तसे निर्देश देण्यात येणार असल्याचेही त्यांनी अधिक माहितीत सांगितले.

पालिकेने ठरवलेल्या नियमांची पूर्तता करणाऱ्या फेरीवाल्यांवरच कारवाई होणार नसून, नियमांची पायमल्ली करणाऱ्या फेरीवाल्यांवर कारवाई करण्यात येईल, असेही आडताणी म्हणाले. फेरीवाल्यांना ठराविक जागा आणि पदपथ धंदा करण्यासाठी देण्यात आलेले आहेत. ते सोडून त्यांनी अतिक्रमण केल्यास किंवा रस्त्यांवर पसारा वाढवल्यास तसेच ९ सप्टेंबरनंतर आलेल्या फेरीवाल्यांवर कारवाई करणार असल्याचे त्यांनी 'लोकमत'ला सांगितले.

सर्वोच्च न्यायालयाने सर्व फेरीवाल्यांना कायदेशीर संरक्षण दिले आहे. मात्र राज्यसभेची मंजुरी अद्याप या कायद्याला नाही; तरीही पालिका आणि पोलीस अधिकारी फेरीवाल्यांवर वारंवार कारवाई करीत असल्याच्या तक्रारी संघटनांकडे येत असल्याची माहिती आझाद हॉकर्स युनियनचे संस्थापक दयाशंकर सिंह यांनी दिली.

फेरीवाल्यांवरील कारवाईविरोधात आझाद हॉकर्स युनियनने आज आझाद मैदानात निदर्शने केली. त्या वेळी युनियनच्या शिष्टमंडळाने उपनगराचे पालकमंत्री नसीम खान यांची भेट घेत पालिका आणि पोलिसांच्या मनमानी कारवाईबाबत वाचा फोडली. त्यावर पालकमंत्र्यांनी आडताणी यांच्याशी संपर्क साधत तत्काळ कारवाई थांबवण्याचे आदेश दिल्याचे सिंह यांनी सांगितले. पोलिसांच्या एकतर्फी कारवाईबाबत विचारणा करण्यासाठी पालकमंत्र्यांनी १ ऑक्टोबर रोजी पोलीस आयुक्तांसोबत बैठक आयोजित केली आहे. (प्रतिनिधी)

### पश्चिम उपनगरांत पोलिसांची एकतर्फी कारवाई

- मुंबईत एकूण ९३ पोलीस ठाणी असून, त्यातील २१ पोलीस ठाणी पश्चिम उपनगरांत आहेत.
- उभ्या मुंबईत १ जानेवारी ते ३१ मार्च २०१३ दरम्यान फेरीवाल्यांवर करण्यात आलेल्या कारवाईत ३ कोटी ४३ लाख ३३ हजार ७५० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.
- पश्चिम उपनगरांत येणाऱ्या १७ पोलीस ठाण्यांमधून २ कोटी १५ लाख ४९ हजार १०० रुपये दंड आकारल्याची माहिती माहितीच्या अधिकारातून मिळाली.

# फेरीवाले व रस्त्याच्या बाजुला किरकोळ विक्री व्यवसाय करणाऱ्या पदपथ विक्रेते यांना कायदेशिर तरतुदीनुसार परवाना व ओळखपत्र मिळवुन देण्यासाठी सुविधा सेवा केंद्रामार्फत औपचारिक व तांत्रिक सहाय्य मागणीसाठीचा अर्ज

अर्जदाराचे अलिकडच्या काळातील छायाचित्र चिकटवावे

अर्जदाराची स्वाक्षरी / डाव्या हाताचा अंगठा

दिनांक :

प्रति,
मा. व्यवस्थापकिय संचालक,
सुविधा सेवा केंद्र,
युनिट नं. ४०७/४०८, मास्टरमाईंड बिल्डींग नं. १,
आय.टी. पार्क, रॉयल पाम्स, आरे कॉलनी,
मयुर नगर, गोरेगांव (पुर्व), मुंबई - ४०० ०६५.

**विषय :- फेरीवाला / पदपथ विक्रेता म्हणून सुविधा सेवा केंद्राच्या सेवा यादीमध्ये नांव नोंदणी करून घेणेबाबत .....**

महोदय,

मी उपरोक्त विषयानुसार विनंती अर्ज करतो/करते की, मी मागील काही वर्षांपासून/महिन्यांपासून/दिवसांपासून फेरीवाला म्हणुन/रस्त्याच्या बाजुला किरकोळ विक्री करणारा पदपथ विक्रेता म्हणुन व्यवसाय करित असुन 'पदपथ विक्रेता (उपजीविका संरक्षण आणि पदपथ विक्री विनियमन) विधेयक व राष्ट्रीय फेरीवाला धोरण २००९ च्या नुसार मला सर्व कायदेशिर हक्क ओळखपत्र परवाने व देशपातळीवर / राज्यपातळीवर / व स्थानिक पातळीवर सक्षमपणे नेतृत्व करणाऱ्या संघटनेचे सभासदत्व मिळवुन देण्याकामी मला सुविधा सेवा केंद्राकडून सर्व प्रकारची तांत्रिक मदत मिळावी. त्यासाठीचे सुविधा सेवा केंद्राचे सेवा शुल्क भरण्यास मी तयार आहे.

१. अर्जदाराचे नाव : ______________________________

२. पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता ______________________________
(घरनंबर व पिनकोडसह)
______________________________
______________________________
______________________________ पिन कोड | | | | | | |

३. मोबाईल नंबर
(कृपया मोबाईल नंबर बदलु नये)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 0 | | | | | | | | | | |
| 0 | | | | | | | | | | |

४. जन्मतारीख : | D | D | M | M | Y | Y | Y | Y |   ५. वय : [ ] वर्षे

६. व्यवसायाचा प्रकार / व्यवसायाचे नांव :- ______________________________

______________________________

७. फिरून व्यवसाय करणाऱ्या विक्रेत्याचा फेरीला जाण्याचा मार्ग उदा. महात्मा गांधी चौकापासुन - शिवाजी नगर- सोमवार पेठ मार्गे - भाजी मंडई कडे. (एका जागेवर उभे/बसुन व्यवसाय करणाऱ्या विक्रेत्याने हा रकाना भरू नये.)

मार्ग ______________ पासुन ते ______________

______________ मार्गे ______________ पर्यंत

८. एका जागी स्थिर/उभे/बसुन व्यवसाय करित असलेल्या विक्रेत्यांसाठी व्यवसाय करित असलेल्या ठिकाणचा पत्ता रस्ता, चौक व इतर ठळक ठिकाण मार्केटच्या नावासह संपूर्ण पत्ता लिहावा. (पिनकोड सह)

______________________________

______________________________

______________________________ पिन कोड | | | | | | |

९. **विक्रीसाठी समाविष्ठ वस्तु/उत्पादने/पदार्थांची नावे.**

| | | |
|---|---|---|
| १) ______ | २) ______ | ३) ______ |
| ४) ______ | ५) ______ | ६) ______ |
| ७) ______ | ८) ______ | ९) ______ |
| १०) ______ | ११) ______ | १२) ______ |
| १३) ______ | १४) ______ | १५) ______ |
| १६) ______ | १७) ______ | १८) ______ |
| १९) ______ | २०) ______ | २१) ______ |
| २२) ______ | २३) ______ | २४) ______ |
| २५) ______ | २६) ______ | २७) ______ |
| २८) ______ | २९) ______ | ३०) ______ |
| ३१) ______ | ३२) ______ | ३३) ______ |

व इतर ______________________________

१०. सध्या हा व्यवसाय करण्यासाठी कर किंवा देणगी रूपाने एखाद्या संस्थेला काही रक्कम अदा करित आहात काय..?
(होय/नाही) ____________

११. सध्या आपण कोणत्या एखाद्या संघटनेचे सभासद आहात काय..? (होय / नाही) ____________

१२. सभासद असल्यास संघटनेचे नांव : ________________________________
(कोणत्याही संघटनेचे सभासद नसल्यास रकान्यात काही लिहु नये.)

१३. संघटनेचा पत्ता / पत्रव्यवहाराचा पत्ता ________________________________
(संघटनेचे सभासद नसल्यास रकान्यात काही लिहू नये.)

________________________________________________

________________________________________________

________________________________________________

१४. संपर्क क्रं.

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 0 | | | | | | | | | | |
| 0 | | | | | | | | | | |

अर्जदाराची स्वाक्षरी / डाव्या हाताचा अंगठा

**१५. अर्जदाराचे अलिकडील काळातील आयडेंटी साईजचे ४ फोटो चिकटवावेत**
**(फोटोला टाचणी लावु नये.)**

## १६. अर्जासोबत जोडावयाच्या आवश्यक कागदपत्रांची यादी.

| अ.क्र. | कागदपत्राचा तपशिल | जोडले (✓) आहे/नाही |
|---|---|---|
| १. | शिधापत्रिका (रेशन कार्ड) किंवा, आधार कार्ड किंवा, बँक खात्याची पासबुक किंवा, निवडणुक आयोगाने प्रदान केलेले मतदान ओळखपत्र किंवा, वीज बिल किंवा, टेलिफोन बिल किंवा, घर भाड्याने असल्यास घरमालकासोबत झालेला भाडेकरार किंवा, वाहन चालविण्याचा परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स) **या पैकी कोणत्याही एकाची छायांकित प्रत (झेरॉक्स)** | |
| २. | फोटोप्रुफसाठी निवडणुक आयोगाचे ओळखपत्र किंवा, ड्रायव्हिंग लायसन्स किंवा आधार कार्ड, किंवा पॅन कार्ड या पैकी कोणतेही एकाची छायांकित (झेरॉक्स) प्रत | |
| ३. | सुविधा सेवा केंद्राकडून सर्व तांत्रिक सेवा घेण्यासाठीच्या सेवा शुल्कासाठी<br>**'Suvidha Seva Kendra A/C No. 50200006865835'**<br>या नावे मुंबई येथे देय असलेला (Payable at Mumbai) विना परतावा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) (खालील सेवा शुल्क तक्त्याप्रमाणे.) | |

**सेवा शुल्क तक्ता**

| महानगरपालिका कार्यक्षेत्रासाठी | |
|---|---|
| या नावनोंदणी अर्जासोबत<br>रू. ३०००/- (तीन हजार रूपये फक्त) | परवाना, ओळखपत्र, संघटना सभासदत्व पावती, प्रमाणपत्र स्विकारतेवेळी<br>(रू.२०००/- दोन हजार रूपये फक्त) |

| नगरपालिका / नगरपरिषद / नगरपंचायत कार्यक्षेत्रासाठी | |
|---|---|
| या नावनोंदणी अर्जासोबत<br>रू. २०००/- (दोन हजार रूपये फक्त) | परवाना, ओळखपत्र, संघटना सभासदत्व पावती, प्रमाणपत्र स्विकारतेवेळी<br>(रू.१५००/- एक हजार पाचशे रूपये फक्त) |

सुविधा सेवा केंद्राच्या सेवा शुल्कासाठी अर्जासोबत जोडलेल्या धनाकर्षाचे (डिमांड ड्राफ्ट) चे विवरण खालील प्रमाणे.

| धनाकर्ष रक्कम रूपये अंकामध्ये | धनाकर्ष रक्कम रूपये शब्दामध्ये | धनाकर्ष क्र. Demand Draft No. | बँकेचे नाव व शाखा |
|---|---|---|---|
| ₹ | ______________________<br>______________________ | | |

### **हमी पत्र** (UNDERTAKING)

मी अर्जदार कारणे हमी पत्र देतो की, सदर अर्जासोबत मी सुविधा सेवा केंद्राच्या विनापरतावा सेवा शुल्कासाठी रक्कम ₹ ३०००/२०००/- या रकमेचा धनाकर्ष जोडला असुन उर्वरित सेवा शुल्काची रक्कम ₹ २०००/१५००/- ओळखपत्र/परवाना/संघटनेचे सभासद प्रमाणपत्र देते वेळी अदा करण्याचे मान्य करित आहे. ही सेवा शुल्काची रक्कम 'सुविधा सेवा केंद्राकडून' सेवा घेण्यासाठी अदा करित असुन ही रक्कम विनापरतावा असल्याचे मला माहित व मान्य आहे. याकामी काही अन्य माहिती किंवा कागदपत्रे आवश्यक असल्यास त्याविषयी सुविधा सेवा केंद्राकडून मला वेळोवेळी प्राप्त झालेली पत्रे किंवा दुरध्वनी/भ्रमणध्वनी संदेश या नुसार मी लेखी स्वरूपात माहिती देईन व गरजेनुसार याविषयीचे सक्षम अधिकारी किंवा पदाधिकारी यांचे कार्यालयात सुविधा सेवा केंद्राकडून सुचित केल्यास स्वत: हजर राहीन यासाठी हे हमी पत्र दिले.

दिनांक :

______________________
स्वाक्षरी